खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

सुविचार
आयुष्यात सगळे निर्णय आपले नसतात, काही निर्णय वेळ आणि परिस्थितीचे असतात.

वर्ष : ०५ | अंक : २६२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०४ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# भाजपमध्ये मोठी उलथापालथ ?
## बंगालचा निकाल लागताच संघटनेसह राज्य सरकारांमध्येही फेरबदल, नेमका काय निर्णय होणार?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, नवी दिल्ली :** पश्चिम बंगालसह पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल उद्या, सोमवारी (दि.४) जाहीर झाल्यानंतर भारतीय जनता पक्षामध्ये राष्ट्रीय स्तरावरील संघटनात्मक बदलांपासून ते राज्य सरकारांतील फेरबदलांपर्यंत अनेक मोठे निर्णय होण्याची प्रक्रिया वेगवान होण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. पक्षसूत्रांच्या माहितीनुसार, मे महिना हा भाजप पक्षसंघटनेच्या अनेक प्रलंबित निर्णयांना अंतिम रूप देणारा ठरू शकतो. महिला आरक्षण विधेयकाच्या मुद्याला धार देण्यासाठी भाजप पक्षसंघटनेपासून अन्यत्र महिलांना जास्तीत जास्त संधी देण्याचे धोरण पक्षनेतृत्व अंमलात आणू शकते.



विधानसभांच्या निवडणूक निकालानंतर भाजपमध्ये संघटनात्मक पुनर्रचना, नेतृत्वाचा समतोल आणि महिलांना वाढते प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर आधारित महत्त्वाचे निर्णय दिल्लीच्या पातळीवरून वेगाने घेतले जाण्याची प्रक्रिया व त्यातील महिलांच्या सहभागाचा मुद्दा या घडामोडींचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

नितीन नवीन यांची पक्षाध्यक्षपदी नियुक्ती झाल्यावर पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतही याच महिन्यात फेरबदल होण्याची शक्यता आहे. नवीन यांच्या नव्या संघात अनुभवी आणि युवा नेतृत्वाचा समतोल राखण्यावर भर दिला जाणार असल्याचे संकेत आहेत. त्यातही महिलांना अधिक प्राधान्य देण्याची भूमिका घेताना नवीन यांच्या संघातही ३३ टक्क्यांहून अधिक पदे महिलांना दिली जाण्याची दाट शक्यता आहे. यामुळे पक्षाच्या संघटनात्मक रचनेतही महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीयरीत्या वाढणार आहे.

पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये निवडणुका असलेल्या उत्तर प्रदेशमध्ये राजकीय हालचाली वेगाने सुरू झालेल्या असताना मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाच्या विस्ताराची तयारी पूर्ण झाल्याचे सांगितले जाते. जेमतेम १० महिन्यांवर आलेल्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा विस्तार महत्त्वाचा मानला जात आहे. यामध्ये योगी मंत्रिमंडळातील रिक्त पदे भरण्यासह काही विद्यमान मंत्र्यांच्या खात्यांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

बिहारमध्येही सरकार विस्तार अपेक्षित आहे. नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपद सोडून राज्यसभा सदस्यत्व स्वीकारल्यावर नवे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात विस्ताराला गती देणे केंद्रीय नेतृत्वाला भाग आहे. भाजप आणि जदयू यांच्यातील सत्तावाटप सूत्रानुसार दोन्ही पक्षांना समान प्रतिनिधित्व दिले जाऊ शकते. प्रत्येक पक्षाकडे १६-१६ मंत्रीपदे असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या मुख्यमंत्र्यांकडे असलेली काही खाती भाजप कोट्यातील मंत्र्यांना दिली जाऊ शकतात, तर उपमुख्यमंत्र्यांकडील विभाग जदयूच्या कोट्यातील मंत्र्यांना दिले जाण्याची शक्यता आहे. नितीशकुमार यांच्या इच्छेनुसार निशांतकुमार यांना बिहारचे उपमुख्यमंत्रिपद मिळणे अपेक्षित आहे.

# जोगवाड्यात रात्री भीषण आग !
## आदिवासी शेतकऱ्याचा संसार राख, लाखोंचे नुकसान

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०३, जिंतूर :** तालुक्यातील जोगवाडा येथील गट क्रमांक ५६ मध्ये राहणारे आदिवासी शेतकरी मारोती देवबा वाळके यांच्या शेतातील घराला दि. २ मे रोजी रात्री भीषण आग लागून संपूर्ण संसार राख झाला. या आगीत संसारोपयोगी साहित्य, मोठ्या प्रमाणातील धान्यसाठा, रोख रक्कम तसेच महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली असून लाखोंचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे वाळके कुटुंबावर मोठे आर्थिक संकट कोसळले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रात्री उशिरा अचानक घरातून धूर व आगीच्या ज्वाळा बाहेर येताना दिसताच परिसरातील नागरिक व शेजारील शेतकरी मदतीसाठी धावून आले. ग्रामस्थांनी पाण्याच्या सहाय्याने आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, मात्र आग वेगाने पसरल्याने घरातील सर्व साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या भीषण आगीत गहू, ज्वारी, हरभरा, करडी, तूर, उडीद, सोयाबीन यांसह मोठ्या प्रमाणातील धान्य जळून नष्ट झाले. तसेच फर्निचर, कपडे, भांडी, घरगुती साहित्य, शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड, पॅन कार्ड आणि इतर महत्त्वाची कागदपत्रेही पूर्णतः जळून खाक झाली. घरात ठेवलेली रोख रक्कमही आगीत नष्ट झाल्याने कुटुंबीयांसमोर उपासमारीची वेळ येण्याची भीती व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच शेजारील शेतकरी घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी मोठ्या प्रयत्नांनी आग आटोक्यात आणली.

प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असली, तरी आगीचे नेमके




कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाल्याने वाळके कुटुंबीयांचा आक्रोश पाहून ग्रामस्थही हळहळले.घटनेची माहिती मिळताच चारठाणा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दळवे यांनी घटनास्थळी भेट दिली. तलाठी वाकळे यांनी पंचनामा केला. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पीडित आदिवासी शेतकरी कुटुंबाला शासनाकडून तातडीने आर्थिक मदत, धान्य व निवाऱ्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर कोयनानगर बस स्थानकाचे रुपड पालटलं

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०२, पाटण :** गेले अनेक वर्षे खड्डे आणि डबऱ्यांनी व्यापलेले वाहनांना, प्रवाशांना व बस स्थानकावरील दुकानदार व्यापाऱ्यांना धुळीमुळे भयंकर त्रासाचे ठरलेले अनेक वर्षे दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असलेले कोयनानगर बस स्थानक अखेर दुरुस्त झाले. कार्यकारी अभियंता महेश रासनकर यांनी कोयनानगर बस स्थानकाच्या दुरुस्तीसाठी घातलेले लक्ष पूर्णत्वास नेले याचे समाधान प्रत्येक कोयनानगर वासियांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. दुरुस्त झालेले अतिशय भव्य बस स्थानक सर्वांचे आकर्षण ठरले आहे.

यापूर्वी कोयनानगर बस स्थानक हे अतिशय अस्वच्छ आणि खड्ड्यांनी, डबऱ्यांनी व्यापलेले, प्रवाशी, स्थानिक नागरिक व्यापाऱ्यांना त्रासाचे ठरलेले त्याच्या डागडुजीकडे गेली अनेक वर्षे सर्वांची प्रतिक्षा लागलेली अशा अवस्थेत असलेल्या बस स्थानकाची कायम डागडुजी व्हावी अशी स्थानिक जनतेची मागणी होती. अधिकारी देखील सकारात्मक होते परंतु बस स्थानक



दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी कोण देणार..? या प्रश्नाचे उत्तर मिळत न्हवते. एस टी परिवहन विभागाने हा निधी द्यावा आणि कोयना प्रकल्प ते काम करून घेईल अशी संकल्पना होती. परंतु परिवहन विभागाने निधी उपलब्ध करून देणे शक्य नसल्याचे सांगताच कोयना प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता पोतदार यांनी तातडीने अंदाजपत्रक तयार करून कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे यांचेकडे पाठविला. सिंचन विभागा कडून इतका निधी उपलब्ध होत नसल्याने बिगर सिंचन विभागामधून निधी उपलब्ध करून सार्वजनिक काम पूर्ण करून घेण्याच्या सूचना झाल्या आणि लगेच कार्यकारी अभियंता महेश रासनकर यांनी तातडीने निविदा काढून काम उत्तम प्रकारे आणि दर्जेदार होणेबाबत अधिकारी यांना सूचना केल्या.

कोयनानगर बसस्थानकाचे काम दर्जेदार व चांगल्या प्रतीचे होण्यासाठी स्वतः कार्यकारी अभियंता वारंवार या कामावर भेट देत होते. कामाचा दर्जा चांगला राखला पाहिजे अशा सूचना वारंवार ठेकेदार यांना ते देत होते. आज कोयनानगर येथे अतिशय देखणं बस स्थानक उभ राहील आहे. याचे सर्व श्रेय कोयना प्रकल्पाच्या सर्व अधिकाऱ्यांना जाते असे पाटण तालुका भाजपा अध्यक्ष नंदकुमार नंदकुमार सुर्वे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. ते शेवटी म्हणाले महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील यांनी कोयना प्रकल्प पुन्हा नावारूपाला येण्यासाठी कोयना धरण डावा तीर वीज प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. शिवाय खास बाब म्हणून कोट्यवधी रुपयांचा निधी दिला आहे.त्यामुळे त्यांना कोयनेतील जनता धन्यवाद देत आहे.

# मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' वर सेल्फी अन् फोटो काढण्यास मज्जाव...

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०३, मुंबई :** यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंकच्या (मिसिंग लिंक) लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र प्रवासादरम्यान सेल्फी, फोटो, घेण्यासाठी वाहनचालक केबल स्टेड ब्रिज व बोगद्याजवळ वाहने थांबवत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. द्रुतगती मार्गावर वाहने थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्याने ते टाळावे, असु आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्यावतीने करण्यात येत आहे.

**➤ सेल्फी, फोटो काढण्यासाठी थांबू नका...**

१ मे महाराष्ट्र दिनी रोजी यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे मार्गावरील कनेक्टिंग लिंक अर्थात 'मिसिंग लिंक'चे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले. महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसेच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किमी वेग मर्यादा आणि बस व प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किमी वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे व दोन पुलावर पूर्णपणे २४७ सीसीटीव्ही यंत्रणेचे लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे. सेल्फी, फोटो आणि रिल काढण्यासाठी थांबू नका नाहीतर मोठ्या दंडाची आकारणी होऊ शकते. तसेच तुमच्यासह इतरांच्याही वाहनांना धोका होऊ शकतो. या कारणास्तव, नियमांचे पालन करा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास करा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

**➤ खोपोलीहून कुसगावला जोडतो 'मिसिंग लिंक'**

'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबईच्या बाजूकडील खोपोलीला पुणे जिल्ह्यातील लोणावळ्याजवळील कुसगावला जोडतो. यामुळे द्रुतगती मार्ग पूर्णपणे प्रवेश नियंत्रित होईल आणि घाटावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

**➤ सहा हजार ७०० कोटींचा खर्च**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (चडठ्रउ) सहा हजार ७०० कोटी खर्च करून विकसित केलेल्या या प्रकल्पात दोन बोगदे, दोन पूल आणि टायगर व्हॅलीवरील एका केबल-स्टेड पुलाचा समावेश आहे. यामुळे तीव्र उतार असलेल्या आणि अपघातप्रवण खंडाळा किंवा भोर घाट भागाला वळसा घालून एक नवीन मार्ग उपलब्ध झाला आहे, जिथे विशेषतः शनिवार-रविवार आणि सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये अनेकदा वाहतूक कोंडी होते.

**➤ सहा किलोमीटर अंतर कमी**

'हा प्रकल्प १९.१६ किलोमीटर लांबीच्या आधुनिक कॉरिडॉरचा एक भाग आहे', असे एम.एस.आर.डी.सी.ने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, 'या 'मिसिंग लिंक'मुळे मुंबई-पुणे प्रवासाचे अंतर सुमारे सहा किलोमीटरने कमी होईल आणि प्रवासाचा वेळ २० ते ३० मिनिटांनी कमी होईल'.

# नवी कोरी डबल डेकर बस जळून खाक, दुरुस्ती दरम्यान कुर्ला आगारात भीषण घटना

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** मुंबईमध्ये लोकलनंतर जर कोणाचा जास्त उपयोग केला जात असेल तर ती आहे मुंबईची दुसरी जीवनवाहिनी बेस्ट. होय बेस्ट बसेसने प्रवास करण्यासाठी रोज लाखो मुंबईकर रस्त्यावर उभे असतात. बेस्टने अलिकडच्या काळान अनेक नव्या बस आणल्या आहेत. या बस अत्याधुनिक आहेतच पण त्याचसोबत त्या इलेक्ट्रिकही आहेत. दरम्यान, असं असलं तरी प्रवाशांच्या सरक्षेचा प्रश्न मात्र अधांतरीच आहे की काय, असं म्हणावं लागणारा प्रश्न आता उपस्थित होतो आहे. कारण आता कुर्ला बसडेपोमध्ये उभी असलेली बेस्टची नवीकोरी डबलडेकर बस ही जळून खाक झाली आहे. या आगीत संबंधित बसचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. ही घटना घडली तेव्हा बसमध्ये एकही प्रवासी नव्हता आणि बस आगारात देखभालीसाठी उभी होती, ज्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित नवी इलेक्ट्रिक डबल डेकर बस कुर्ला डेपोत उभी होती. यावेळी तिची सर्व्हिसिंग सुरु होती. स्विच मोबिलिटी या कंपनीचे कर्मचारी बसची नियमित तपासणी आणि दुरुस्ती करत होते. हे काम सुरु असताना अचानक या बसमधून धूर सुरु झाला. पुढच्या काही वेळात आगीने रौद्र रुप धारण केले. ही आग प्रचंड भीषण होती. बघता बघता या आगीने संपूर्ण बसस भस्मसात केली. आगीच्या ज्वाळा आणि धूर दूरुनसुद्धा दिसत होते. ज्यामुळे प्रवाशांमध्ये काहीवेळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

**आगीचे कारण काय?**

दरम्यान, यासर्व प्रकाराबद्दल आता बेस्ट प्रशासनाने माहिती दिली आहे. त्यांनी सांगितलं की ही आग तांत्रिक बिघाडामुळे लागली असल्याचा आम्हाला अंदाज आहे. तांत्रिक भाषेमध्ये याला थर्मल इन्सिडंट म्हटलं जातं. यामुळे इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीमध्ये किंवा इलेक्ट्रिक वायरींगच्या मुख्य सर्किटमध्ये बिघाड होतो, आणि अशा प्रकारची आग लागू शकते, मात्र याप्रकरणातही हेच कारण आहे का नाही, याची खात्री प्रशासनाने दिलेली नाही. त्यांनी याची सखोल चौकशी करू आणि बेस्टच्या तांत्रिक समितीमार्फत अधिकृत माहिती जाहीर करु असं म्हटलं आहे.




## पुस्तकातली खूण कराया...

आजचा जमाना सोशल मीडियाचा आहे; लोक आता वाचत नाहीत, रील्स बनवतात. त्यामुळे मराठी प्रकाशन व्यवसायाने आधुनिकतेची कास धरून बदल घडवले पाहिजेत,' केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी दिल्लीत अलीकडं दिलेला हा सल्ला. गडकरींनी सांगितलं त्यात वाचन संस्कृती लोप पावत असल्याबद्दलची जाणीव आणि पुढचा रस्ता कोणता असावा या गोष्टींचंही प्रतिबिंब उमटलं आहे. कालच झालेल्या महाराष्ट्र दिनाच्या निमित्तानं, आजकाल मुलं प्रत्यक्ष पुस्तक हाती धरून वाचनापासून दूर जात असल्याची जी भीती आहे तिला भिडावं लागेल.

रोजचा पेपर वाचण्याची सवय मुलांना लावणं ही पुस्तक वाचनाकडे वळण्याची पहिली पायरी ठरू शकते. आज घरातली मुलं किंवा तरुणांना रोज एक तरी वर्तमानपत्र वाचण्याची सवय लावणं अत्यंत गरजेचं आहे. कारण त्यामुळं मेंदूला चालना मिळण्याची जी प्रक्रिया असते ती प्रक्रिया पॉडकास्ट किंवा व्हिडीओमध्ये इतक्या सहजासहजी मिळत नाही, असं सांगितलं जातं. वाचनामुळं विचार करण्याची क्षमता विकसित होते. एखाद्या विषयावर स्वतःचं मत तयार करण्यासाठी सतत वाचन आवश्यक. कोणत्याही लोकशाहीसाठीही ते अत्यंत आवश्यक ठरतं कारण सजग नागरिक घडवण्याचा पाया हा वाचनातच असतो. आज अनेक तरुणांची शब्दसंपदा मर्यादित होत चालली आहे.

दैनंदिन संभाषणात मोजकेच शब्द वापरले जातात. आपण वर्तमानपत्र वाचतो, तेव्हा एकाच भावनेसाठी किती वेगवेगळे शब्द वापरले जाऊ शकतात, हेही समजतं. व्याकरण सुधारतं, अभिव्यक्ती नेमकी होते आणि विचार अधिक स्पष्ट होतात हे फायदे तर आहेतच. आज तरुण- प्रौढ व्हिडिओ, रील्स, शॉर्ट कंटेंट वगैरे पाहायला तयार आहेत. पण वाचायला तयार नाहीत. ग्रंथालयं हळूहळू ओस पडत आहेत याचं एक उदाहरण दिल्लीत राष्ट्रीय नाट्य विद्यालयाच्या आवारातून स्थलांतरित झालेल्या तुलसी वाचनालयाचं देता येईल. संगणक-मोबाइल आल्यावर आपलं हातानं लिहिणंही कमी झाल्याचं सांगणारे अनेक संपादकही भेटतात. नकळत्या वयातच हाती मोबाइल येणारी पुढील पिढी कदाचित आपलीच स्वाक्षरी करणंही विसरेल, असंही गंमतीनं म्हटलं जातं.

जेन झी, अल्फा, बीटा वगैरे युवा पिढ्याच नव्हे तर आपल्यातले अनेकजण खरंच वाचनापासून दूर जात आहेत की वाचनाची सवयच एका नव्या रूपात परिवर्तित होत आहे? या संदर्भात एक उत्तर प्रदेश, राजस्थान सरकारांचा अलीकडचा एक आदेश पाहिला पाहिजे. त्यानुसार त्या राज्यांतील सर्व सरकारी शाळांमध्ये रोजचं वर्तमानपत्र वाचूनच कामकाजाची सुरवात होणार आहे. खरंच तसं होत असेल तर हे अतिशय स्तुत्य म्हणावं लागेल. रोजचं वर्तमानपत्र वाचणं म्हणजे फक्त बातम्या जाणून घेणे नसून ते समाजाशी, देशाशी आणि जगाशी जोडलं जाणं असंही सांगितलं जातं. अर्थात आजकाल वर्तमानपत्र ऋखऱ्या अर्थानं किती जण वाचतात हाही- संशोधनाचा विषय ठरावा. आपण फक्त मथळ्यांवर नजर टाकत साधारणतः आठेक मिनिटांत अख्खा पेपर नजरेखालून घालतो, असं अभिमानानं सांगणारे एक ज्येष्ठ मराठी पत्रकार मध्यंतरी भेटले होते !

जगभरात शिक्षणक्षेत्रात डिजिटल आणि पारंपरिक पद्धती यांच्यात संतुलन साधण्याची वाढती गरज अधोरेखित होते. स्वीडनसारखा डिजिटलदृष्ट्या प्रगत देशाच्या सरकारनं शाळांमध्ये पुस्तकं, वही आणि पेन यांचा वापर वाढवण्यावर भर देण्याचा निर्णय जेमतेम आठवड्याआधी घेतला. डिजिटल साधनांचा अतिवापर झाल्यानं विद्यार्थ्यांच्या वाचन-लेखन कौशल्यांमध्ये घसरण होत असल्याचं निरीक्षण समोर आल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. अनेक शाळांत लॅपटॉपऐवजी पाठ्यपुस्तकं, छापलेल्या नोट्स आणि हस्तलिखित सराव यावर भर दिला जातो आहे. फिनलंड आणि फ्रान्स यांनी शाळांमध्ये मोबाइल फोनच्या वापरावर निर्बंध घालण्याचे निर्णय घेतले आहेत. जपानमध्ये प्राथमिक शिक्षणात हस्तलिखित लेखन आणि पारंपरिक शिक्षणपद्धतीला अजूनही मोठे महत्त्व दिले जाते. जर्मनीनंही डिजिटल शिक्षणाबाबत सावध भूमिका घेतली आहे.

'न्याहरी राजासारखी, जेवण श्रीमंतासारखं आणि रात्रीचं जेवण गरीबासारखं,' असं आपल्याकडं म्हटलं जातं. न्याहरी जशी शरीरासाठी, तसंच वर्तमानपत्र वाचन हा मेंदूसाठीचा नाश्ता असतो. वर्तमानपत्रांमध्ये नकारात्मक बातम्या असतात. पण त्याचबरोबर अनेक सकारात्मक, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धक गोष्टीही त्यात असतात. आपण काय आणि कसं घेतो हा यातला खरा मुद्दा.या पार्श्वभूमीवर गडकरींचा सल्ला लक्षणीय ठरतो. वाचन संस्कृती टिकवायची असेल, तर तिला आधुनिकतेशी जोडावं लागेल. सोशल मीडियाचा वापर साधन म्हणून जाणतेपणे करावा लागेल तरच 'एआय म्हणजे भस्मासूर,' अशी संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांची भीती अनाठायी ठरण्याची शक्यता आहे. मराठी प्रकाशन क्षेत्रानंही या दिशेने पावले टाकली आहेत. आपल्या अनेक नामवंत प्रकाशकांनी डिजिटल माध्यमांचा स्वीकार करत वाचकांशी नव्या पद्धतीने संवाद साधण्यास सुरुवात केली असून स्टोरी टेल, ऑडिबल सारख्या प्लॅटफॉर्ममुळे वाचनाचा अनुभव अधिक व्यापक झाल्याचा अनुभव आहे.

**- मंगेश वैशंपायन**

# मानवतेला काळीमा फासणारी घटना !

महाराष्ट्र दिनाचा सूर्य मावळण्याआधीच दोन अल्पवयीनांवर झालेल्या भीषण अत्याचार आणि खुनांच्या घटनांमुळे पुणे जिल्हा हादरला. पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे एका ६५ वर्षीय नराधम व्यक्तीने आपल्या नातीच्या वयाच्या अवघ्या ४ वर्षीय चिमुरडीवर बलात्कार करून तिचा निर्घुण खून केला.

चाकण जवळील महाळुंगे येथे एका १६ वर्षाच्या परप्रांतीयाने अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याचा खून केला. महाराष्ट्र दिनीच घडलेल्या या दोन भीषण घटनांनी केवळ पुणे जिल्हाच नाही तर संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला आहे. नसरापूर आणि चाकण मधील घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्याच आहे. या घटनांनी तळपायाची आग मस्तकात गेली असून संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे.

नसरापूर मधील नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी यासाठी लोक रस्त्यावर उतरून आंदोलन करू लागली आहे. शनिवारी रात्री नसरापूर आणि परिसरातील संतप्त नागरिकांनी पुणे बंगळुरू महामार्गावरील नवले पुलावर ठिय्या आंदोलन केले. मुख्यमंत्र्यांच्या आश्वासनानंतर संतप्त नागरिकांनी आंदोलन मागे घेतले असले तरी नागरिकांचा रोष कमी झालेला नाही. नसरापूर मधील घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला असून मानवतेला काळिमा फासणाऱ्या या घटनेने राज्यात महिला तसेच मुलींच्या




सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थात महाराष्ट्रात घडलेली ही पहिलीच घृणास्पद घटना नाही. मागील काही वर्षात तर अशा घटनांची मालिकाच सुरू आहे. दोन वर्षापूर्वी बदलापूर येथील शाळेत ४ वर्षाच्या चिमुरडीवर शाळेतीलच एका कर्मचाऱ्याने बलात्कार करून खून केला या घटनेनंतरही संपूर्ण महाराष्ट्रात असा उद्रेक पाहायला मिळाला होता. त्याआधीही महाराष्ट्रात अशा अनेक घृणास्पद घटना घडल्या की ज्याने संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला. कोपर्डीची घटना तर अजूनही ताजीच आहे. अर्थात वर उल्लेख केलेल्या घटना या फक्त प्रातिनिधिक आहेत. अशा घटना आपल्या राज्यात दररोज घडत असतात.

दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना वाचायला मिळतेच. घटना घडून गेल्यावर शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले जाते. अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नयेत यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. नसरापूर प्रकरणात आरोपी असलेल्या नराधमाने याआधीही अशा घृणास्पद घटना केल्याची बाब समोर आली आहे. पॉक्सो कायद्याअंतर्गत त्याला तुरुंगाची वारी करावी लागलेली आहे. पॉक्सो कायद्या सारख्या गंभीर गुन्ह्यात अटक झालेल्या नराधमास अशा प्रकारे मोकळे सोडले तर तो पुन्हा असा प्रकार करू शकतो हे माहित असूनही त्याला तुरुंगाच्या बाहेर का सोडण्यात आले ? असा प्रश्न पडतो. पॉक्सो प्रकरणात तुरुंगाची वारी भोगूनही हा नराधम पुन्हा तेच कृत्य करतो आणि एका चिमुरडीचा जीव घेतो याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा धाक उरला नाही. कायद्याचा धाक नसल्यानेच हे नराधम असे माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य करण्यास मागे पुढे पाहत नाही.

कायद्याचा धाक नसल्यानेच दिवसाढवळ्या महिलांची, मुलींची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशाप्रकारचे नराधमी कृत्य करण्याची हिंमत या नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही, पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळीमा फासणारे कृत्य करत आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना शोभनीय नाही. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात आज कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलिस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार, उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती. आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलिस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात. तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना फाशीचीच शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचारांच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# वेळीच सावध व्हा! यंदा बदलत्या हवामानामुळे उन्हाचे चटके, दुष्काळाचे सावट व मान्सूनवरएल निनोचे संकट

दिवसेंदिवस बदलत्या हवामानामुळे वातावरणात आमुलाग्र बदल होतांना दिसतो.यामुळे अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून पाण्याचा दुष्काळ पडण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.सध्याच्या परिस्थितीत राज्यासह देशातील अनेक भागात ४० ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पोहोचले आहे, म्हणजे सर्वत्र तापमानाने ४० अंश सेल्सिअस तापमान पार केल्याचे स्पष्ट दिसून येते.काही भागात वादळी वाऱ्यासह बेमोसमी पाऊस पडत आहे.यामुळे संपूर्ण वातावरणात आमुलाग्र बदल झाल्याचे दिसून येते. राज्यासह देशातील ज्या शहराचे तापमान जास्तीत जास्त फक्त ४० अंश सेल्सिअस पर्यंत रहात होते त्या संपूर्ण शहरांनी तापमानाचा उच्चांक गाठून ४५ अंश सेल्सिअस पर्यंत तापमान पार केल्याचे दिसून येते.हा तापमान वाढीचा प्रकार अत्यंत धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस वाढत्या तापमानामुळे मोठी बिकट आणि गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. आज देशातील औद्योगिक, शहरीकरण,सिमेंट रोड, गाड्यांचा धुर,एसी, लोकांच्या वाढत्या सुखसुविधा यामुळे तापमानात दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढ होत असून याचा परिणाम आपणा सर्वांना भोगावा लागत आहे. अती उष्णतेचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून याचा परिणाम शेतीवर मोठ्या प्रमाणात पडत असुन यंदा दुष्काळाचे सावट शेतकऱ्यांच्या डोक्यावर मंडरावतांना दिसत आहे.सोबतच राज्यात एल निनोमुळे भीषण पाणी टंचाईचे संकट ओढवण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.कारण प्रशांत महासागरामध्ये एल निनोची स्थिती सक्रिय होत असल्याने मान्सूनच्या पावसावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची भीती वर्तवली जात आहे.यामुळे मान्सूनच्या उत्तरार्धात म्हणजे जुलै ते सप्टेंबर दरम्यान पावसाचे प्रमाण अधिक कमी राहू शकते.एल निनोमुळे महाराष्ट्रातील बहुतांश भागात विशेषत: मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात, नेहमीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे.किनारी कोकण विभाग तसेच विदर्भातील काही भागात तुलनेने पावसाचे वितरण चांगले राहू शकते.परंतु सरासरीपेक्षा कमी पावसाचा धोका असल्याने खरीप हंगामातील पिकांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.यंदाची भीषण उष्णता ही वाढते औद्योगिकीकरण, कार्बन उत्सर्जन आणि बेसुमार जंगलतोडीचा परिणाम आहे.ही समस्या तात्पुरती नसून भविष्यात महाभयानक संकटाची नांदी आहे यावर वेळीच लगाम कसली नाही तर भयावह संकट निर्माण होऊ शकते.कारण सध्याच्या परिस्थितीत विदर्भातील मुख्य शहराचे तापमानाच्या बाबतीत विचार केला तर अकोला -४५, वर्धा -४५, नागपूर -४४.४, अमरावती -४४.२, गोंदिया -४४.५, यवतमाळ -४३.२, ब्रम्हपुरी -४३.२, गडचिरोली --४३.२ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले आहेत.यामुळे विदर्भ जनूकाय आगीची भट्टी बनली की काय असे वाटत आहे.कारण आजच्या परिस्थितीत विदर्भ हे जगातील हॉट शहरांमध्ये गणल्या गेले आहे ही चिंताजनक बाब आहे.देशात बदलत्या हवामानामुळे काही भागात आगडोंब उसळला आहे,तर काही भागात गारपीट किंवा वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे हा सर्व प्रकार आणि येणारे एल निनोसंकट मानवाच्या अतिरेकामुळे निर्माण झालेली गंभीर आणि धोकादायक परिस्थिती आहे.असे सांगितले जाते की १४० वर्षांनंतर हा एल निनो येत आहे ही महाभयंकर संकटांची नांदी आहे. पॅसिफीक महासागरात जेव्हा तापमान वाढते तेव्हा जगाचे हवामान चक्र बिघडते असे सांगितले जाते यालाच एल निनो म्हणतात.परंतु ही अत्यंत धोक्याची घंटा आहे.कारण एल निनोमुळे महासागराचे तापमान २ अंश सेल्सिअसने वाढल्याचे सांगितले जाते.महासागराचे तापमान वाढणे म्हणजे संपूर्ण सृष्टीला धोक्याचे संकेत आहे.कारण बदलत्या हवामानामुळे देशासह संपूर्ण जगात गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून दिवसेंदिवस समुद्राचे पाणी वाढत आहे व जमीनीच्या पोटातील पाणी कमी-कमी होत आहे.हा सर्वप्रकार जंगलतोडीमुळे निर्माण झाला आहे.कारण शहरीकरण व आधुनिकीकरणामुळे जेवढेही पावसाचे पाणी पडते त्याच्या ८० टक्के पाणी समुद्राला जाऊन मिळते.कारण वाढत्या औद्योगिकरण व शहरीकरणामुळे जमीनीत पाणी जाण्याचे मार्ग ८० टक्के मार्ग बंद झाले आहे.त्यामुळे पाणी जमिनीच्या मुळाशी जातच नाही.याचा परिणाम म्हणजे तापमानात वाढ व भीषण पाणी टंचाई दिसून येते.राज्यांच्या विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा शिल्लक असल्याचे सांगितले जाते आणि आता एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पाऊस कमी होण्याची चिन्हे आहेत.यावर सरकारने उपाययोजना करण्याची सुरुवात केली आहे.परंतु या संपूर्ण परिस्थितीला सर्वात जास्त औद्योगिकरण, शहरीकरण व जंगलतोड जबाबदार आहे. जोपर्यंत राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली होणारी जंगलतोड थांबणार नाही आणि मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड होणार नाही तोपर्यंत आपण या भयावह घटनांवर मात करू शकणार नाही.त्यामुळे राज्यासह देशातील वाढते तापमान पहाता व वेळोवेळी बदलते हवामान पहाता वृक्षलागवड युद्धपातळीवर होणे आवश्यक आहे.मुख्यत्वेकरून राज्य सरकार, सामाजिक संस्था, शाळा-महाविद्यारये यांनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण केले पाहिजे.आजही राज्यासह देशातील अति दुर्गम भागात पिण्याच्या पाण्यासह अनेक गंभीर समस्या आहेत.यामुळे या भागात आपल्याला कुपोषण,भुकमरी असे भयावह चित्र दिसून येते.त्यामुळे पावसाचे पाणी रोखायचे असेल वृक्षलागवड करणे गरजेचे आहे अन्यथा शेतकऱ्यांचे हाल बेहाल होतील व याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागेल. **जय हिंद !!**

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## रस्ता रोको

रस्ता रोको करता
विचार आधी करा
रहदारी अडकलेली
मारत बसते चकरा

रूग्ण वाहिका फसे
कणव असावी जरा
आजारीमाणसांच्या
धड धड वाढेलं उरा

वेळेचे गणित चुकते
बट्ट्याबोळ हो पुरा
कशी उरकावी कामे
समयआधीचं अपुरा

जीव हैराण भुकेनी
तहानेनी येई चकरा
वाट पाहती आप्तेष्ट
अनेक समस्या घरा

दंगल पेटेलं कधीही
आग भडके सरारा
जनसंपत्ती नुकसान
आंदोलनाचा दरारा

सर्वसामान्यजनांच्या
क्रोधाचा वाढे पारा
आंदोलन दुर्बळ होई
उलट वाहणारा वारा

उठसूठ ही आंदोलने
उतरावा सगळा तोरा
विश्रांती द्याअसंतोषा
बदलून जाईल व्होरा

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

## परिवहन महामंडळाच्या अधिकार्यांनी, परिवहन मंत्र्यांना नियमांची माहिती का दिली नाही?

रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहीता, वाचता, बोलता आली तर परवाना मिळेल, महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय परिवहन मंत्र्यांनी घेतला होता, त्याला प्रती आव्हान परप्रांतीय वाहनचालकांनी घेऊन १५ लाख रिक्षा, टॅक्सी चालकांचा मोर्चा ४ मे रोजी काढणार असे जाहीर केले.

रिक्षा टॅक्सी चालक - मालक संघटनांचे प्रतिनिधी आपल्या नेत्यांना भेटले.त्यांच्या नेत्यांनी क्षणांचाही विलंब न लावता परिवहन मंत्र्यांना त्यांनी दिले आदेश बदलण्यास भाग पाडले. हा परप्रांतीय वाहनचालकांना विजय आणि महाराष्ट्रातील मराठी माणसाचा पराजय आहे. परिवहन मंत्र्यांनी दिलेले आदेश पाहून मराठी माणूस सुखावला होता.आता, १०१ दिवसांची मुदत वाढ दिली. पुढे ती वर्षभर वाढवून मिळेल यात शंका नाही. मराठीची शिकवणी शासकीय पैशाने नको. काही महिन्यांपूर्वी हिंदी भाषा सक्तीची करताना १५ हजार शिक्षक भरती करण्यात येणार होती.

महाराष्ट्रात उठाव झाला तेव्हा सरकारने निर्णय बदलला. असेच, आता मराठी भाषा वापरावरून झाले. मंत्र्यांनी निर्णय घेताना मराठी



भाषा, मराठी माणूस यांची बदनामी होणार नाही याची काळजी घ्यावी. १२ कोटी मराठी जनतेची थट्टा केली जाणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**- महादेव गोळवसकर**
**मुंबई, ९९६९४७६२०९**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### बामल्लीच्या राकेश पावशेंची एमपीएससीतून PSI पदी गगनभरारी
### आमदार मोरे यांच्याकडून सत्कार; तरुणांसाठी प्रेरणादायी यश



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, बामल्ली (ठाणे) :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) पोलीस उपनिरीक्षक (PSI) परीक्षेत बामल्ली गावचे सुपुत्र राकेश कमलाकर पावशे यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. राज्यातील ६१५ गुणवंतांमध्ये ८५ वा क्रमांक पटकावत त्यांनी केवळ कुटुंबाचेच नव्हे तर समस्त १४ गाव व आगरी समाजाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ग्रामीण भागातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत राकेश यांनी हे यश खेचून आणले. अथक परिश्रम, चिकाटी व शिस्तीच्या बळावर मिळवलेले हे यश आज प्रत्येक स्पर्धा परीक्षार्थी तरुणासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

राकेश यांच्या या गौरवशाली यशाने बामल्लीसह पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश गोवर्धन मोरे यांच्या हस्ते नुकताच त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी जनार्दन पावसे, किसन जाधव, गणेश जयपाल, नकुल गायकर, रमेश काटे, लालचंद पाटील, जयेंद्र भोईर, संकेत पावसे, उमेश शेलार आणि सुनील पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

राकेश पावशे यांचे यश हे ग्रामीण भागातील मुलांनाही मोठी स्वप्ने बघता येतात याचा पुरावा आहे. खाकी वर्दीत ते जनतेची निस्वार्थ सेवा करतील, हा विश्वास आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा, असे गौरवोद्गार आमदार राजेश मोरे यांनी यावेळी काढले. राकेश पावशे यांच्या यशाची ही गाथा अशीच उंच भरारी घेत राहो, हीच सदिच्छा.

### महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने '४था SME अवॉर्ड २०२६' चे भव्य आयोजन
### तायक्वांडो जगतासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान सोहळा

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०३, मुंबई :** महाराष्ट्र दिनाच्या गौरवपूर्ण निमित्ताने दक्षिण मुंबईतील वालकेश्वर येथे "4th SME Award २०२६' चा भव्य आणि प्रेरणादायी समारंभ दि.०१ मे २०२६ रोजी यशस्वीरीत्या पार पडला. हा कार्यक्रम 'तायक्वांडो एज्युकेशन युनिव्हर्सिटी ऑफ इंडिया'चे अध्यक्ष तसेच 'स्पोर्ट्स मार्शल आर्ट्स एंटरटेनमेंट' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात देशभरातील विविध क्षेत्रांतील प्रतिभावंत मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमात समर्पण, संघर्ष आणि यश यांचे प्रेरणादायी दर्शन घडले. यावेळी तायक्वांडो क्षेत्रातील वरिष्ठ गुरु - ग्रँडमास्टर परवेज खान, मास्टर विजय कामले, मास्टर रोहित राहुल कदम, मास्टर सुजित सिंह, मास्टर तुकेश वसंत दसगांवकर तसेच मास्टर डॉ.अमन कुशवाह यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या सर्वांना जय कुमार गोहिल यांच्या हस्ते सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच खेळाडूंच्या गटात उदयोन्मुख प्रतिभावंत खेळाडू - ध्रुवी जाधव, सावी लोके, श्रावणी पिंगळे, अरिहंत सोनवणे, नेत्रा सुतार, यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी सन्मानित करण्यात आले. हे सर्व विद्यार्थी परेल-भोईवाडा येथील रोहित तायक्वांडो अकादमीतील विद्यार्थी आहेत.

### महाबळेश्वरच्या अद्यावत दिवाणी व फौजदारी न्यायालय इमारतीचा लोकार्पण सोहळा संपन्न



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०३, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या नवीन अद्यावत इमारतीचा लोकार्पण सोहळा महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाबळेश्वर गिरीस्थान नगरपालिकेचे नगराध्यक्ष सुनिल शिंदे यांच्या हस्ते उपनगराध्यक्ष नासिर भाई मुलाणी यांच्या अध्यक्षतेखाली या इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. या नवीन इमारतीमुळे महाबळेश्वर मधील न्यायालयाचा अनेक वर्षांचा प्रलंबित प्रश्न आता कायमस्वरूपी सुटला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून महाबळेश्वर मध्ये न्यायालयाची सोय व्हावी, अशी मागणी होती. २०१० पासून येथे कोर्टाची निर्मिती झाली असली, तरी न्यायालयासाठी हक्काची आणि सोयीस्कर अशी स्वतंत्र इमारत उपलब्ध नव्हती. ही गरज ओळखून महाबळेश्वर नगरपालिकेने पुढाकार घेतला आणि पालिकेच्या मालकीची असलेली पोलीस ग्राऊंड शेजारील इमारत न्यायालयासाठी देण्याचा मानस व्यक्त केला. या जुन्या इमारतीचे पूर्णपणे नूतनीकरण आणि सुशोभीकरण करून आता एका अद्यावत आणि सुंदर इमारतीत न्यायालयाचे कामकाज सुरू होणार आहे. या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी स्थानिक पदाधिकारी, वकील संघटनेचे प्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. लोकापर्ण सोहळ्या प्रसंगी नगराध्यक्ष सुनिल शिंदे, उपनगराध्यक्ष नासीर भाई मुलाणी, मुख्याधिकारी योगेश पाटील, गटनेते ॲड.संजय जंगम, नगरसेवक अफजल भाई सुतार, आबा शिंदे, रोहित ढेबे, रवींद्र कुंभारदरे, संतोष अखाडे, राजू नालबंद, किसन शेठ शिंदे, मिलिंद ढेबे, ॲड.विजयकुमार दस्तुरे माजी नगराध्यक्ष डी.एम बावळेकर, युसूफ भाई शेख, नगरसेवक संदिप सांळुंखे, शरद बावळेकर, शंकर ढेबे, नगरसेविका विमल पारठे, संगिता वाडकर, विद्या बावळेकर, स्मिता पाटील, रेश्मा ढेबे, नगरपालिका अधिकारी अमित माने, मुरलीधर धायगुडे, माजी मुख्यलिपिक आबाजी ढोबळे, राजुभाई मुलाणी व नगरपालिका कर्मचारी व इतर मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती होती.

> २०१० मध्ये कोर्टाची निर्मिती झाली परंतु न्यायालयाला स्वतः ची सुयोग्य इमारत नव्हती. नगरपालिकेने पुर्वीची पोलीस ग्राउंड शेजारील इमारत न्यायालयाकरिता देण्याचा निर्णय घेतला आणि तेव्हापासून सातत्याने पाठपुरावा करून या इमारतीचे सुशोभीकरण पूर्ण झाले आहे. आज या अद्यावत इमारतीचे लोकार्पण होताना महाबळेश्वरवासीयांच्या न्यायालयाचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला आहे याचा आनंद आहे.
>
> **- ॲड. संजय जंगम (गटनेते, नगरसेवक महाबळेश्वर नगरपालिका)**

## महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षपदी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ
### कार्यकारिणी आणि सर्वसाधारण बैठकीमध्ये एकमताने निर्णय

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, पुणे :** बालेवाडी येथील क्रीडा संकुलात आयोजित महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या कार्यकारिणी आणि सर्वसाधारण या दोन्हीही सभांमध्ये केंद्रीय विमान उड्डाण आणि सहकार खात्याचे राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. आज क्रीडा आयुक्तालयातील मुख्य स्टेडियम सभागृहामध्ये सकाळी साडेअकरा वाजता प्रथम कार्यकारिणी सभा झाली तर त्यानंतर दुपारी ०१ वाजता सर्वसाधारण सभा आयोजिली होती.



गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात पुणे येथे आयोजित झालेल्या बैठकीनंतर संघटनेचे अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या आकस्मिक अपघाती निधन झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही बैठक आयोजिली होती. सर्वप्रथम बैठकीच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार आणि संघटनेचे उपाध्यक्ष संदीप जोशी यांची एकमताने निवड करण्यांत आली. यावेळी माजी खासदार मनोज कोटक, मनोज भोरे, स्मिता यादव यांसह इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

दोन्ही सभांचा प्रारंभ ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री कै.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्याने झाला. यावेळी दादांच्या क्रीडा क्षेत्रातील कार्यकर्तृत्वाचा गौरव करताना संघटनेचे महासचिव संजय शेटे यांनी दादांच्या अनेक ऐतिहासिक कामाचा हवाला देताना ऑलिंपिक भवन बांधकामाचा प्रारंभ, खेळाडूंसाठी अनेक सन्मान अशा योजनांची माहिती दिली. ते म्हणाले की, राज्यातील क्रीडापटू आणि प्रशिक्षक ही आपली क्रीडासंपत्ती आहे असे दादांचे म्हणणे होते. नेहमीच खेळाडू केंद्रीभूत ठेवून त्यांनी अनेक सुधारणा राबवल्या. याच काळात संघटनेने गमावलेल्या पदाधिकारी-सभासदांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यांत आली, यामध्ये भारतीय ऑलिंपिक संघटनेचे माजी अध्यक्ष स्व.सुरेश कलमाडी, एन. रामचंद्रन,शैलेंद्र शर्मा,यांसह प्रसिद्ध गानसम्राज्ञी आशाताई भोसले, शालनताई भोंडवे यांचा समावेश होता.

**शासकीय अर्थ सहाय्य आणि मिशन लक्ष्यवेध**

महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेला आर्थिक स्त्रोत नसल्याकारणाने शासनाकडून पुरेसे आर्थिक सहकार्य मिळण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री आणि संघटनेचे प्रमुख आश्रयदाते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव दाखल करण्याचे या बैठकीत ठरले.आसाम, गुजरात, केरळ आदी राज्यांमध्ये ज्या पद्धतीने क्रीडा संघटनांना शासकीय अर्थसाहाय्य केले जाते याकडे लक्ष वेधत आपल्या राज्यातील संघटनेला संलग्न सर्वच खेळ संघटनांना आर्थिक मदत होत नसल्याची खंत महासचिव संजय शेटे यांनी व्यक्त केली. त्यावर मुख्यमंत्र्यांना सादर केल्या जाणाऱ्या या प्रस्तावात राज्य एकविध क्रीडा संघटनांच्या स्पर्धा आयोजन, विविध शिबिरे आदी कार्यकृतींसाठी मदत होणे गरजेचे आहे.

त्यासाठी सिएसआरच्या माध्यमातून शासनाने अर्थसहाय्य करण्यास विनंती करावी आणि शासनास ही मदत मागतेवेळी एक समग्र धोरण आखले जावे. तदनंतर हा प्रस्ताव दाखल करावा ही सूचना उपाध्यक्ष मनोज कोटक यांनी केली.

शासनाने नुकताच 'मिशन लक्ष्यवेध' हा उपक्रम सुरू केला असून त्यामध्ये अनेक त्रुटी असल्याचे मत संदीप भोंडवे यांनी व्यक्त केले. त्यावर जवळपास सर्वच संघटकांनी या योजनेच्या रचनेवर आक्षेप घेऊन ही योजना राबवण्यासाठी शासन राज्य क्रीडा संघटनांना विश्वासात घेत नसल्याची तक्रार केली. सभेचे अध्यक्ष संदीप जोशी यांनी यावर एक समितीचे गठण करून क्रीडा आयुक्त यांच्याशी चर्चा करण्याचे निर्देश दिली.

**वर्ष २०२९ मध्ये राज्यात ४० वी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजन**

पुणे आणि महाराष्ट्राच्या प्रमुख शहरात ४० वी नॅशनल गेम्स अर्थात राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन व्हावे. अशी मागणी २०२५ साली खासदार मुरलीधर मोहोळ यांनी केली होती. सदरील मागणीस राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संमती देवून क्रीडा खात्यास तश्या सूचना दिलेल्या असल्याचे महासचिव संजय शेटे यांनी सांगितले. गेल्या तीनही राष्ट्रीय स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचा संघ अव्वलस्थानी असल्याने याही राष्ट्रीय स्पर्धेमध्ये हे स्थान टिकवण्याची मोठी जबाबदारी असल्याने खेळाडूना त्यांच्या शिबिरे आणि सोईसुविधा यांचे नियोजनबद्ध आयोजन होण्यासाठी, ऑलिंपिक संघटना आणि राज्य शासन यांच्या प्रतिनिधींमध्ये समन्वय राहण्यासाठी एक समिती गठीत व्हावी. हा निर्णय घेण्यात आला.

राज्य ऑलिंपिक स्पर्धा ही आपल्या राज्यामध्ये ऑलिंपिक संघटनेमार्फत आयोजित होणारी स्पर्धा असून तिचे नियमित आयोजन करावे. यावर सर्वच खेळ संघटनांनी मागणी केली. त्यानुसार महासचिव यांनी सांगितले की क्रीडा आयुक्तालयाकडे जानेवारी महिन्यातच प्रस्ताव सादर झाला असून आता पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.एकंदर २५ विषय असणाऱ्या या बैठकीत सर्वच विषयावर विचार विनिमय केला गेला. यात राज्य शासनाचा क्रीडा विभाग निर्णय प्रक्रियेमध्ये ऑलिंपिक संघटना पदाधिकाऱ्यांना न डावलता सामील करून घेण्याची मागणी, विविध क्रीडा संघटनांचे प्रस्ताव,ऑलिंपिक डे आयोजन, वर्ष २०२७ मध्ये

मेघालयात आयोजित होणाऱ्या ३९ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये राज्याचा संघ, बालेवाडी येथे खेळाडू निवासासाठी बहूमजली इमारतीची आवश्यकता, शासनाचे ५ टक्के आरक्षणाचे ब्लॉक चेन तंत्रज्ञान या विषयावर विचार व्यक्त केले गेले. बैठकीच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करण्यांत आले.

त्यानंतर स्वर्गीय अजितदादा पवार, ऑलिंपिक पदक विजेते खाशाबा जाधव यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर उपाध्यक्ष मनोज कोटक यांचे स्वागत सोपान कटके,संदीप जोशी यांचे स्वागत डॉ.राकेश तिवारी स्मिता शिरोळे यांचे स्वागत लिना कांबळी तर मनोज भोरे यांचे स्वागत शैलेश टिळक यांनी केले. प्रास्ताविक आणि आभार महासचिव संजय शेटे यांनी केले.

## आगरी समाजाच्या २० संत-महंतांचा 'राष्ट्रीय आध्यात्मिक पुरस्कारा'ने गौरव
### १५ मे रोजी पेणमध्ये मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान; देशभरातील साधू-संतांचे महासंमेलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०३, ठाणे :** आगरी समाजाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेला नवी उंची देणाऱ्या २० संत-महंत, कीर्तनकार, भजनसम्राट व कलावंतांचा 'राष्ट्रीय आध्यात्मिक पुरस्कार २०२६'ने सन्मान होणार आहे.

येत्या १५ मे २०२६ रोजी पेण येथील नगरपालिका मैदानावर आगरी समाजाच्या देशव्यापी साधू-संत संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची घोषणा आयोजक समितीने शनिवारी केली.

**समाजप्रबोधन ते बालकीर्तनकार : विविध क्षेत्रांचा गौरव**

ठाणे, रायगड, नवी मुंबई, पुणे, नाशिक, सोलापूर जिल्ह्यातील कीर्तन, भजन, प्रवचन, मृदंग, बासरी, शास्त्रीय गायन या क्षेत्रात आयुष्य वेचणाऱ्या मान्यवरांचा यात समावेश आहे. १२ वर्षीय बालकीर्तनकार कु.ज्ञानेश्वरी ठाकूर पासून ते वयोवृद्ध कीर्तनकार गोविंद महाराज घरत यांच्यापर्यंत सर्व वयोगटातील साधकांचा सन्मान होणार आहे.

**धाटावकर महाराज व नारायणबाबा गडबकर यांना मरणोत्तर गौरव**

समाजप्रबोधनासाठी आयुष्य समर्पित करणारे पुरुषोत्तम पाटील धाटावकर महाराज, रोहा व नारायण तुकाराम पाटील उर्फ नारायणबाबा गडबकर, पेण यांना मरणोत्तर पुरस्कार जाहीर झाला आहे.

**राष्ट्रीय आध्यात्मिक पुरस्कार २०२६ - मानकरी**

कीर्तन सेवा : जगन्नाथ पंढरीनाथ पाटील (शहापूर-ठाणे), बाळासाहेब गतीर महाराज (नाशिक), अमित चंद्रकांत म्हात्रे (पेण), पद्माकर बाबू पाटील (पनवेल), रामकृष्ण काशिनाथ मोकल (पनवेल), कु.ज्ञानेश्वरी अच्युत ठाकूर (पेण), गोविंद महाराज घरत (उरण).

**भजन गायन/सेवा** :- दत्तात्रेय मोरेश्वर पाटील (पेण), शंखूनाथबुवा पडघेकर (पनवेल), हरिश्चंद्र गणू पाटील (पनवेल), ज्ञानेश्वर भजनी मंडळ (नाशिक).

वादन व गायन :- प्रताप भगवान पाटील - मृदुंग सम्राट (खारघर), सचिन लहू धुमाळ - बासरी (अलिबाग), गणेश भास्कर बंडा - शास्त्रीय गायन (उरण).

**प्रवचन व प्रबोधन** :- एकनाथ सांगोलकर (आळंदी), अंबादास करांडे महाराज (पंढरपूर).

**विशेष योगदान** :- एकनाथ ए. पाटील - निस्वार्थ आध्यात्म सेवा (नवी मुंबई), धा. म. पाटील - अभ्यासू व्यक्तिमत्त्व (पेण).

**मरणोत्तर** :- पुरुषोत्तम पाटील धाटावकर महाराज (रोहा), नारायण तुकाराम पाटील - नारायणबाबा गडबकर (पेण).

'हजारो भाविक उपस्थित राहणार'

आगरी समाजाची आध्यात्मिक ओळख देशपातळीवर पोहोचवणे हा या संमेलनाचा उद्देश आहे.

१५ मे रोजी सकाळी ९ ते सायं. ६ या वेळेत कीर्तन, प्रवचन, भजनाचे कार्यक्रम होणार असून राज्यभरातून १० हजारांहून अधिक भाविक उपस्थित राहतील, अशी माहिती संयोजन समितीचे अध्यक्ष यांनी दिली.

> **कार्यक्रम स्थळ व वेळ**
>
> दिनांक : १५ मे २०२६, शुक्रवार
>
> वेळ : सकाळी ९ ते सायं.६
>
> स्थळ : नगरपालिका मैदान, पेण, जि.रायगड
>
> प्रमुख उपस्थिती : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मान्यवर संत-महंत

## खापरखेड्यात भीम सैनिक युवामंच द्वारे बुद्ध जयंती उत्साहात

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** महाकरुणिक गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त खापरखेडा वार्ड क्रमांक ४ येथे भीम सैनिक युवा मंच द्वारे उत्साहपूर्ण वातावरणात बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. त्यावेळी मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित होते. त्यानंतर परिसरात कॅन्डल मार्च व भोजनदान करण्यात आले. न कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून चिंचोली ग्राम पंचायतच्या सदस्या सारिका धनविजय व पत्रकार विनोद गोडबोले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अश्विन मेश्राम, राजकुमार निकोसे, प्रकाश मानवटकर, रंगारी, सुनील शुलकर दीपक सहारे कमलेश दमके राजेंद्र बिटले अनिकेत



रंगारी, चिंटू निकोसे तसेच शुभांगी शुलकर, मीनाक्षी धनविजय, प्रज्ञा घरडे कोमल, मानवटकर आदीनी विशेष परिश्रम घेतले.

# पोहण्याचा मोह आला अंगलट, गटांगळ्या खात बुडाले !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, पिंपरी-चिंचवड :** उन्हाळ्याच्या सुट्टीचा आणि विकेंडचा आनंद घ्यायला मावळ परिसरात आलेल्या पुण्यातील तीन तरुणांचा पवना नदीत बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना मावळ तालुक्यातील थूगाव परिसरातील पवना नदी पात्रात घडली. मृतांमध्ये प्रथमेश शिंदे, अश्विन भालेराव आणि आयान शेख यांचा समावेश आहे. आज रविवारची सुट्टी असल्याने हे तिघेही पवना धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. वाढत्या उकाड्यामुळे त्यांनी नदीत पोहण्याचा निर्णय घेतला, मात्र पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तिघेही बुडाले.




**घटनेमुळे परिसरात हळहळ!**

घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ आणि शिवदुर्ग मित्र मंडळाच्या सदस्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर तिन्ही तरुणांचे पार्थिव बाहेर काढण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांनी नदी-नाल्यात पोहताना आवश्यक ती काळजी घ्यावी, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**मावळमध्ये मृत्यूंची मालिका; दोन दिवसांत सात जणांचा बळी**

गेल्या दोन दिवसांत मावळ परिसरात एकूण सात जणांचा बुडून मृत्यू झाल्याच्या घटनांनी गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. पवना धरणासह इतर धरण परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्यांची संख्या वाढली असताना अशा दुर्घटना सातत्याने घडत आहेत. उन्हाळ्याच्या सुट्ट्या आणि विकेंडचा आनंद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात या भागात दाखल होत आहेत. मात्र, पाण्याचा अचूक अंदाज न येणे, खोल पाण्यात उतरणे, तसेच सुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे हे जीवघेणे ठरत आहे.

प्रशासनाकडून वारंवार सूचना देऊनही काही पर्यटक निष्काळजीपणा करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पवना धरण किंवा इतर जलाशयांमध्ये पोहताना आणि पाण्यात उतरताना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

**दोन दिवसांत सहा जणांचा बुडून मृत्यू**

मावळ तालुक्यात दोन दिवसांत सहा जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. या दुर्घटना तीन वेगवेगळ्या ठिकाणी घडल्या असून, कामगार दिनी तीन कामगारांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. जाधववाडी येथे सेल्फी काढण्याच्या नादात तिघे मित्र बुडाले. अजय गारुडे, अनिकेत पवार आणि संतोष येडके (तिघेही रा. भोसरी) अशी त्यांची नावे आहेत. वलवण धरणात योगेश पालवे (वय ३०, रा. कुरवंडे, लोणावळा), यश कुलदीप धनोरिया (वय १३, रा. लोणावळा) यांचा मृत्यू झाला. मनोज भारत गौतम (वय २५, मूळ रा. उत्तर प्रदेश) असे पवन मावळातील साळुंब्रे गावच्या हद्दीत पवना नदी पात्रात बुडून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

## थोडक्यात

### जिंतूर-परभणी रोडवर भीषण अपघात; पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०३, परभणी :** जिंतूर-परभणी रोडवरील माकपाटी परिसरात रविवारी (दि.०३ मे) पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात होऊन एकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गंगाधर शिंदे (वय ३५, रा. लहुजी नगर, परभणी) हे जिंतूरकडून परभणीकडे दुचाकीने जात असताना समोरून येणाऱ्या टाटा एस टेम्पोने जोरदार धडक दिली.

या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. गंगाधर शिंदे हे पोलीस हेडक्वार्टर, परभणी येथे कार्यरत होते. अपघातग्रस्त दुचाकीचा क्रमांक MH 22 Y 9878 असा असून हा अपघात माकपाटी येथील हॉटेल ताईच्या समोर घडला. अपघात रात्रीच्या वेळी झाल्याने मदत पोहोचण्यात काहीसा विलंब झाल्याचे सांगितले जात आहे.दरम्यान, नवनाथ माणिकराव लोनस यांना डायल ११२ वर फोन वरून घटनेची माहिती मिळाली. माहिती मिळताच परभणी ग्रामीणचे पोलिस उपनिरीक्षक कुंडलिक ज्ञानोबा मोहिते व पोलीस पथक घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. मृतदेह पुढील तपासणीसाठी परभणी जिल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला असून, या प्रकरणी पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कुंडलिक ज्ञानोबा मोहिते करत आहेत.

# विठ्ठलगड व मिराबाई शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी मिळवले मोठे यश

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.०३, केज (बीड) :** विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ व मिराबाई शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्वच उच्च माध्यमिक विद्यालयाने १२ वी परिक्षेच्या निकालात घवघवीत यश मिळवले आहे.यामध्ये विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केज शहरातील प्रा.डॉ.विश्वनाथराव कराड विद्यालयाचा विज्ञान शाखेचा एकुण निकाल ९८.५०% तर कला शाखेचा एकूण निकाल ८२.०५% लागला आहे.

तसेच श्री.विठ्ठल उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सां) ता.केज शाळेचा विज्ञान शाखेचा एकूण निकाल १००% तर कला शाखेचा एकूण निकाल ९६.६२% लागला आहे.तसेच बाबुराव मुंडे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव ता.केज शाळेचा विज्ञान शाखेचा निकाल ९९.८९% तर कला शाखेचा निकाल १००% लागला आहे.

तसेच मिराबाई शिक्षण प्रसारक मंडळ माळेगांव ता.केज संचलित बुवासाहेब पाटील उच्च माध्यमिक विद्यालय शिंदी ता.केज या शाळेचा विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९८.७३ % तर कला शाखेचा एकूण निकाल १००% लावत उज्वल यशाची परंपरा यंदाही कायम ठेवली आहे.दरम्यान या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विक्रम (बप्पा) मुंडे,संस्थेचे उपाध्यक्ष विजयकांत (भैय्या) मुंडे, संस्थेचे सचिव अतुल दादा मुंडे यांच्यासह सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केज शहरातील प्रा.विश्वनाथ कराड उच्च माध्यमिक विद्यालयातून विज्ञान शाखेतून १) कु.पवार संपदा दशरथ ८५.००% घेऊण (प्रथम) क्रमांक मिळवला आहे. तर २) कु.मोरे पायल नितीन ८२.००% गुण घेऊन (दूतिय) तर ३) कु. चाळक संचीता गणपत ८१.००% गुण घेऊण (तृतीय) क्रमांक पटकावला आहे.तसेच कला शाखेतून १) कु.अंधारे श्रद्धा मारुती ७३.६७% (प्रथम) २) कु.इंगळे स्वाती सुग्रीव ७२.१७% (दूतिय) ३) कु.यादव प्रणिता विजयकुमार ६१.८०% गुण घेऊन (तृतिय) क्रमांक पटकावला आहे. दरम्यान विद्यालयाच्या प्रा.माधूरीताई मुंडे यांच्यासह परिक्षा प्रमुख व्यंकटराव घुले, प्रा.अनंतराव आघाव, प्रा.संजय काकड, प्रा.ज्योती चाटे, प्रा.प्रमिता कांबळे, प्रा.अनील पारखे, प्रा.योगेश सुर्यवंशी, प्रा.सोमनाथ राऊत, शैलेंद्र हजारे, विशाल भोरे, जे.के.इनामदार, संपत केदार, नामदेव आघाव, हनुमंत मोराळे तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचार्यांनी सर्व उतिर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

श्री.विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सां) ता.केज शाळेच्या १२ वी विज्ञान शाखेतून १) कु.गिते सृष्टी उत्तरेश्वर-८३.३३% (प्रथम) २) कु.गिते श्रुती बालासाहेब-८३% (दूतिय) चि.हाके शुभम अशोक ८१.६७% गुण घेऊन तृतिय क्रमांक पटकावला आहे.तर १२ वी कला शाखेतून १) कु.शिनगारे सोनाली ज्ञानोबा-७८.५०% (प्रथम) २) चि.धस शुभम श्रीहरी-७७.८३% (दूतिय) ३) कु. कागदे शीतल नंदकुमार-७५.८३% गुण घेऊन तृतिय क्रमांक मिळवला आहे. सर्व उतिर्ण विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक प्रा.सचिन हांगे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



श्री.बाबुराव मुंडे पाटील उच्च माध्यमिक विद्यालय देवगाव ता.केज या शाळेच्या विज्ञान शाखेतून १) कु.श्रद्धा रामकिशन गीते ८१.८३% (प्रथम) २) चि.सुशेन बलभीम घुले ८०.५०% (द्वितीय) ३) जान्हवी बाळासाहेब कांदे ८०.००% गुण तृतीय क्रमांक पटकावला आहे. तर कला शाखेतून १) चि.आदित्य राजेंद्र गावखरे ८१.००% (प्रथम) २) चि.प्रतीक सुनील पावरे ७७.००% (द्वितीय) ३) रोहित सोपान गव्हाणे ७०.३०% तृतीय क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या उज्वल यशाबद्दल प्रा.संजय शिवाजी मुंडे यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

मीराबाई शिक्षण प्रसारक मंडळ माळेगांव ता. केज संचलित बुवासाहेब पाटील उच्च माध्यमिक विद्यालय शिंदी ता.केज या शाळेच्या १२ वी विज्ञान शाखेतून १) कु.आकांक्षा रामदास चौरे ८०.८३% (प्रथम) २) तणवीर अर्शदशाह शेख ७९.००% (द्वितीय) ३) साक्षी विलास आरडे ७७.६७% ३) कु.लक्ष्मी अशोक लोखंडे ७७.६७% गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवला तर १२ वी कला शाखेतून १) कु.जाधवर अनिशा युवराज ७४.००% (प्रथम) २) चि.निलेश बंडू शिंदे ७१.५०% (द्वितीय) ३) कु.पुनम भाऊराज गायकवाड ७१.१७% तृतीय क्रमांक पटकावला आहे. शाळेचा एकुण निकाल १००% लागला असून शाळेचे मुख्याध्यापक तथा प्रा.सदाशिव मुंडे सर यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### श्री ढोकेश्वर विद्यालयात, महाराष्ट्र दिन, कामगार दिन साजरा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीताच्या सुरांमध्ये तिरंग्याला सलामी देण्यात आली.

सिताराम खिलारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, १ मे, १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. हा दिवस महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, मराठी अस्मिता, हुतात्म्यांचे बलिदान आणि विजयाचा सोहळा आहे. असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी १०६ हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. महाराष्ट्र घडविणे ही आपली जबाबदारी आहे. आज जागतिक कामगार दिन असून हा दिवस शेतकरी, मजूर, कष्टकरी, कामगार यांनी आपल्या हक्कासाठी केलेल्या संघर्षाची जाणीव करून देतो. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये उन्हात बाहेर न पडता, आपण घरात बसून वेगवेगळे छंद जोपासण्याचे आवाहन केले व सर्वांना महाराष्ट्र दिन जागतिक कामगार दिन व मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लहू जाधव,उपाध्यक्ष अविनाश भालके उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबासाहेब जाधव यांनी केले. सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार पर्यवेक्षिका मनिषा गाडगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी निलेश जासूद,कला विभागाचे समन्वयक विजय सोबले, शास्त्र विभागाचे समन्वयक अशोक गांगड, ज्येष्ठ शिक्षक मल्हारी वागस्कर, रविंद्र मते, नारायण शेळके,राजेंद्र ढोणे, प्रिया डव्हणे यांचे सह पालक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुंबई महापौर चषक तायक्कांदो स्पर्धेत रोहित तायक्कांदो अकॅडमीची दमदार कामगिरी



**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०३, मुंबई :** तायक्कांदो असोसिएशन ऑफ मुंबई यांच्या वतीने व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित मुंबई महापौर चषक तायक्कांदो स्पर्धा २०२५-२०२६ मोठ्या उत्साहात सेंट पॉल बॉयज हायस्कूल, हिंदमाता परेल येथे गुरुवार दि.३० एप्रिल रोजी पार पडली. या प्रतिष्ठित स्पर्धेत जिल्ह्यातील अनेक नामांकित अकॅडमींनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेमध्ये परेल-भोईवाडा येथील रोहित तायक्कांदो अकॅडमीने कॅडेट गटात उत्कृष्ट कामगिरी करत २ सुवर्ण, ६ रौप्य आणि ३ कांस्य पदकांची कमाई करत द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच ऑल ओव्हर पी-व्ही आणि सब-जूनिअर गटातील खेळाडूंनीही उल्लेखनीय यश संपादन करत अकॅडमीच्या यशात भर घातली.

या सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख प्रशिक्षक रोहित व सह प्रशिक्षक ग्रिष्मा घाडीगांवकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यामुळे हे यश शक्य झाले. या यशामुळे अकॅडमीच्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रभावी छाप पडली आहे.

**स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू खालीलप्रमाणे**

**सुवर्ण पदक विजेते :** सानवी बडंबे, सावी लोके, सोहम कनसे, स्मित मोहिते

**रौप्य पदक विजेते :** श्लोक गायकवाड, मुरारी नांदोसकर, मृणाली वागरे, नील खामकर, लवेश बेतकर, ग्रिष्मा घाडीगांवकर, अरहंत सोनवणे, मनस्वी डीचोलकर, स्वरा हळदणकर, जय जाधव, सावी लोके, प्रभास गायकवाड, सानवी बडंबे

**कांस्य पदक विजेते :** आकृती ठाकूर, श्रावणी पिंगळे, स्वरा बांबूळकर, गणेश वलगुडे, सिद्धार्थ जाधव, नेत्रा सुतार, ध्रुवी जाधव, उर्वी पांचाळ, मंजीरी डीचोलकर

# नवीन बिना बौद्ध विहारात गौतम बुद्ध जयंती कामगार व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०३, नागपूर :** नवीन बिना बौद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने महाकारुणीक तथागत गौतम बुद्ध जयंती, कामगार व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अतिथी मोरेश्वर लाडे यांच्या उपस्थितीत सकाळी महाराष्ट्र गीत आणि रामकृष्ण चनकापुरे व शशिकला चनकापुरे यांच्याहस्ते पंचशील ध्वजारोहण तर दुपारी आम्रपाली महिला मंडळाद्वारे परित्राण पाठ घेण्यात आले.



सायंकाळी सामुहिक बुद्ध वंदना घेतल्यानंतर भारतीय बौद्ध महासभेच्या सल्लागार समितीच्या नेतृत्वात नवीन बिना वार्ड क्रमांक १ व २ परिसरातून कॅंडल मार्च काढण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी हरिष रूमकर, पोलिस निरीक्षक पोलिस ठाणे, खापरखेडा (नागपुर शहर), विशेष अतिथि मनोहर डोंगरे, अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा शाखा खापरखेडा, अतिथी मीनाक्षी तागडे, सरपंच चिचोली-खापरखेडा, पत्रकार केशव पानतावने, मयूर तिरपुडे आणि कार्यक्रम व भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष डॉ.जितेंद्र सावजी तागडे या सर्व मान्यवरांनी बुद्धाचा मध्यम मार्ग मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वोत्तम आहे असे मत मांडतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची प्रसंगिकता विषद करीत महाराष्ट्र राज्याच्या निर्माण व कामगारांचे प्रश्न सोडविण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेवर आवर्जून प्रकाश टाकला.

याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभेचे संरक्षक विजय गौरकर, अर्चना गौरकर, कुसुम गौरकर, विजय निकोसे, उत्तम खोब्रागडे, भारतीय बौद्ध महासभा नवीन बिना, उपाध्यक्ष अनिल लांजेवार, सचिव मुकेश बागडे, कोषाध्यक्ष रवींद्र ढोके, हिशोब तपासनीस नरेश डोंगरे धम्मपीठावर तर कार्यक्रमात सल्लागार समितीचे तुळशीराम बागडे, लक्ष्मण लांजेवार, मनोहर गजभिये, मधुकर गौरकर, भैय्याजी सोनटक्के, कृष्णाजी वासनिक, ओमप्रकाश गौरकर, किशोर चव्हाण, अशोक कांबळे, अरुण नारनवरे, अशोक नारनवरे, दत्तगुरू तागडे, उपस्थित होते.

यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षीस देवून प्रोत्साहित केले गेले व १० व्या १२ व्या वर्गात गुणवत्ता प्राप्त सम्यक प्रज्ञानंद तागडे, क्रिष लांजेवार, प्रणया पृथ्वीराज गोलाईत, सुनिधी दुपारे या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता विजय गौरकर, आंचल इंजिनीयरिंग व गावकऱ्यांच्या सौजन्याने आयोजित सामुहिक भोजनदानाने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अहिंसक गणविर, आनंद वासनिक, मिलिंद गौरकर, ज्ञानेश्वर ढोके, आकाश सोमकूंवर, सोनू गणवीर, मोनू ढोके, संचित गौरकर, बॉबी गणविर, संकेत वाहणे, आकाश वासनिक, निर्भय वासनिक, आदित्य धनवटे, ऋषभ ढोके, तनिष्क वासनिक, अद्विक बागडे भारतीय बौद्ध महासभा, आम्रपाली व संघमित्रा महिला मंडळ आणि राहुल नवयुवक संघाच्या कार्यकारिणीने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्पना वासनिक सुत्रसंचालन सारिका तागडे व प्रीती गोलाईत तर आभार विशाखा ढोके व रोहिणी धनवटे यांनी मानले.